| MHPU120002882020 | **नियमित दिवाणी दावा क्र. ४६/२०२०**<br>**आदेश निशाणी क्रमांक १४७**<br>**(सुभद्राबाई उर्फ शकुंतला शिवाजी तरस वि. अमर किरण बालघरे )** |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १२ शशिकांत वसंत उमाप यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १२ हया दि. १३/१०/२०२५ रोजी मयत झाले. वादी क्र. २ चे पत्नीस कॅन्सरचा आजार जडलेला होता. त्यामुळे वादी क्र. २ आणि ३ यांना पेशंटच्या केमोथेरपीसाठी गेल्या ८ महिन्यापासुन हॉस्पीटलमध्ये धावपळ करावी लागत होती. त्यामुळे वादी क्र. २ आणि ३ यांना वारस रेकॉर्डवर घेणेकामी हालचाल करता आली नाही. तसेच वादी क्र. १ हया ८९ वर्ष वयाच्या असल्यामुळे त्यांना चालता येत नाही त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेकामी वादी यांना उशीर झाला. सदरील विलंब हा विनाहेतु असुन तो नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने रदद होणे आवश्यक आहे. सदरील विलंब माफ केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास वादी यांचे अतोनात नुकसान होईल. सबब, सदर विलंब माफ करण्याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ व ७अ ते ७क यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. १५१ वर दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे वादी यांनी प्रतिवादी क्र. १२ यांचे निधन झाल्यानतर ९० दिवसांचे आत वारस रेकॉर्ड वर घेण्याचा अर्ज दाखल केलेला नाही. सदरचे प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा अवसान झाला आहे. वादी यांनी सदरचे प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा अवसान झाल्यानंतर प्रथमतः सदरचे अबेटमेंट हे सेट असाईट करणे आवश्यक आहे त्याशिवाय वारस रेकॉर्ड वर घेण्यास झालेला उशीर माफीचा अर्ज व वारस रेकॉर्ड घेण्याचा अर्ज यांच्यावर आदेश पारीत करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १७ ते २० यांनी देखिल त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याच्या कथनाप्रमाणे सदर अर्जास विलंब झाल्याने सदर अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी वाटप, ठराव व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सबब, दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेकरीता प्रतिवादी क्र. १२ यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. कायदयातील स्थापीत सिध्दांतानुसार कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची तरतुद आहे. त्याचप्रमाणे दावा हा वाटप, ठराव व निरंतरचे ताकीदी संदर्भात असल्याने सर्व आवश्यक पक्षकारांना दाव्यामध्ये समाविष्ठ करणे उचित राहील. त्यामुळे प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी

यांच्या आक्षेपानंतर वादी यांनी अबेटमेंट सेट असाईट करण्याकरीता देखिल अर्ज दिलेला आहे. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

वादीचा अर्ज (नि. १४७) मंजुर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.08.17 17:51:57 +0530

ठिकाण – भोर

दिनांक - १७.०८.२०२६

( एस.डी.शिरसाट )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भोर.